(19)

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
## कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर
**५३९, कसबा करवीर राजेंद्र नगर कोल्हापूर- ४१६ ००४**

क्र.कोविमं/उमा/प्रात्य/ऑनलाईन/ 2916
कोल्हापूर ४१६००४
दिनांक- १६/०१/२०२३.

प्रति,
प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०२३ "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) व "सामान्यज्ञान" (जी.के.) विषयाच्या ऑनलाईन परीक्षेबाबत.**
संदर्भ - पत्र क्र.रा.मं/ऑनलाईन/आय.टी./जी.के./ ६९०६/ दिनांक २१ डिसेंबर, २०२२.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, **"माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विषयाची ऑनलाईन परीक्षा दिनांक २३ मार्च, २०२३ ते २५ मार्च, २०२३ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.३० आणि दुपारी ३.०० ते ५.३० याप्रमाणे सकाळच्या व दुपारच्या सत्रात प्रत्येकी २ तास ३० मिनिटे या कालावधीची राहील.**

तसेच **"सामान्यज्ञान"(जी.के.) विषयाची ऑनलाईन परीक्षा दिनांक २४, २५ व २७ मार्च, २०२३ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० व दुपारी ३.०० ते दुपारी ५.०० याप्रमाणे सकाळच्या व दुपारच्या सत्रात प्रत्येकी २ तास या कालावधीची राहील.** याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**केंद्रसंचालक/पर्यवेक्षक/ नियुक्ती व परीक्षेचे साहित्य वाटप जमा करण्याबाबत व परीक्षेबाबतच्या सूचना**

सदर "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) व "सामान्यज्ञान" (जी.के.) विषयाच्या ऑनलाईन परीक्षा संचलनाबाबत परीक्षा केंद्र संचालक, पर्यवेक्षक व तांत्रिक सहाय्यक यांच्या नेमणूका आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर करण्यात याव्यात व त्यांची नावे मंडळ कार्यालयाकडे पाठवून देण्यात यावीत. सदरच्या नेमणूका करीत असताना केंद्र संचालक व पर्यवेक्षक हे आय.टी विषय न शिकवणारे असावेत याची नोंद घ्यावी, तसेच तांत्रिक सहाय्यक हे आय.टी विषय शिकवणारे असावेत. त्यांची नावे **२० फेब्रुवारी २०२३** पूर्वी या कार्यालयाकडे पाठवावीत.

"माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.)विषय शिकविला जाणाऱ्या प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयांची संगणक प्रयोगशाळा व संगणक यंत्रणा परीक्षेसाठी सुसज्ज करण्यात यावी. सदर परीक्षा ज्या ठिकाणी "माहिती तंत्रज्ञान" (आय.टी.) विषय शिकवण्यास मान्यता दिलेली आहे, अशा कनिष्ठ महाविद्यालयातच घेण्यात येईल. **("माहिती तंत्रज्ञान" (आय.टी.) विषय घेतलेल्या नियमित परीक्षार्थ्यांसाठी फक्त "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विषयासाठी त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय हेच परीक्षा केंद्र राहील.)** या विषयासाठी विद्यार्थी त्यांच्या लेखी परीक्षा केंद्रावर (प्रसंगानुरूप) न जाता कनिष्ठ महाविद्यालयात जातील. तसेच पेपरची वेळ संपावयाच्या वेळेस कनेक्टीव्हीटी खंडीत झाली असेल तर पेपरची वेळ संपताच विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे आपोआप सादर होतील. याबाबत विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयांनी सूचना द्याव्यात. दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेप्रमाणे प्रति तास २० मिनिटे जादा वेळेची सवलत मान्य राहील व या विद्यार्थ्यांसाठी "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) व "सामान्यज्ञान" (जी.के.) विषयांची परीक्षेची वेळ अनुक्रमे ३ तास २० मिनिटे व २ तास ४० मिनिटे राहील.

**तांत्रिक व्यत्ययामुळे किंवा अन्य कारणामुळे परीक्षा देवू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत करावयाची कार्यवाही तसेच परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या विभागीय मुख्य व सहाय्यक समन्वयक यांची माहिती.**

या परीक्षा कालावधीत जे विद्यार्थी तांत्रिक व्यत्यय वा अन्य कारणामुळे निर्धारीत वेळापत्रकानुसार परीक्षा देऊ शकणार नाहीत. त्यांच्यासाठी खासबाब म्हणून सर्व परीक्षा केंद्रावर "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विषयासाठी **दिनांक २७ मार्च, २०२३** रोजी सकाळी ११:०० ते ०१:३० व दुपारी ०३:०० ते ०५:३० या दोन सत्रामध्ये व सामान्यज्ञान विषयासाठी **दिनांक २८ मार्च, २०२३** रोजी सकाळी ११:०० ते ०१:०० व दुपारी ३.०० ते ५:०० या दोन सत्रांमध्ये पुनर्परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. ज्या विद्यार्थ्यांची उपरोक्त कारणास्तव परीक्षा होणार नाही अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विद्यार्थ्यांची माहिती दिनांक २५ मार्च, २०२३ व "सामान्यज्ञान" (जी.के.) विद्यार्थ्यांची माहिती दिनांक २७ मार्च, २०२३ रोजीच्या दुसऱ्या सत्रा पर्यंत विभागीय मंडळ कार्यालयातील विभागीय तांत्रिक सहाय्यक समन्वयकांना कळविणे आवश्यक आहे. दिनांक २७ मार्च, २०२३ व दिनांक २८ मार्च, २०२३ रोजी होणाऱ्या पुनर्परीक्षेसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारण्यात येऊ नये.

या विभागीय मंडळ कार्यालयाकडून खालील विभागीय समन्वयक व जिल्हा समन्वयकांची नेमणुक केली असून त्यांचे नाव, कॉलेजचे नाव, मोबाईल नंबर यांची माहिती देण्यात आली असून,ऑनलाईन परीक्षेबाबत काही तांत्रिक अडचणी आल्यास त्यांच्याशी संपर्क करावा.

**विभागीय समन्वयक**

१) श्रीमती.सुषमा शिवगोंडा पाटील - डी.आर.के.कॉलेज ऑफ कॉमर्स,कोल्हापूर (J २३.०९.००४)
फोन.नं.- ०२३१-२६४१२२४, मो.नं.-९८२३६६७८५५

**सातारा जिल्हयासाठी समन्वयक**

२) श्री. विशाल रामचंद्र शिंदे - मुधोजी हायस्कुल अॅण्ड ज्यु कॉलेज,फलटण, जिल्हा-सातारा (J २१.०८.००४)
फोन.नं.- ०२१६६-२२२३४०, मो.नं.-९९७५०७८६५०

३) श्री किरण वसंत शिंदे - किसनवीर महाविद्यालय,वाई,ता.वाई, जि.सातारा. (J२१.११.००१)
फोन.नं.-०२१६७-२२०१३० मो.नं. -९४२२६०४३२५

**सांगली जिल्हयासाठी समन्वयक**

४) श्री.धनाजी शामराव शेवडे - न्यु इंग्लिश स्कुल अॅण्ड ज्यु. कॉलेज,शिराळा, जि.सांगली (J २२.०९.००९)
फोन.नं.-०२३४५-२७२१४८ मो.नं.- ९८५०४३०९१७

५) श्री. शांतीनाथ चौगोंडा पाटील - माईर्स विश्वशांती गुरूकुल स्कूल,मौजे डिग्रज रोड,सांगली (J २२.०६.०२४)
फोन.नं - ०२३३-२३७२१०२ मो.नं. -८६६८८०३७४२ / ९७६६६५८७६९

**कोल्हापूर जिल्हयासाठी समन्वयक**

६) श्री. वायकसकर बी.एम. - आजरा महाविद्यालय,आजरा जि. कोल्हापूर (J २३.०१.००१)
फोन नं - ०२३२३- २४६३७२ मो.नं. ९२२५८०३७३७ / ९०४९६३५६३७

७) श्रीमती .गडगे ज्योती शंकर - न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल अॅण्ड ज्यु. कॉलेज, ताराबाई पार्क, कोल्हापूर
(J २३.०९.०२७) मो.नं.- ९०२८७४८१५६

८) श्री. कांबळे निलेश दिलीप- श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज,
हातकणंगले, जिल्हा- कोल्हापूर (J.२३.०६.०२२) मो.नं.९५२७८९९६८६

समन्वयकांनी ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा निर्धारित कालावधीत पूर्ण झाली नाही, अशा कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती मुख्य समन्वयक श्रीमती सुषमा पाटील यांना **ई -मेल** व्दारे कळवून विद्यार्थ्यांची परीक्षा घेणेबाबत त्यांच्याशी संपर्क करावा.

(पोवार डी.एस.)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.